

| वर्ष - 9 | अंक -18 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | गुरुवार, दि. 4 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- विराटने इंग्लंडमध्ये दिली फिटनेस टेस्ट!
- रौफची फलंदाजीत विश्वविक्रमी कामगिरी!
- ग्लास उचलला, खुर्ची पुसली!
- जगातील सर्व काही नष्ट होईल

GST: सर्वसामान्यांसाठी आनंदाची बातमी! जीएसटीत बदल केल्याने या वस्तू होणार स्वस्त

# मोदी सरकारची मोठी भेट!

## सध्या अमेरिकेच्या टॅरिफ नीतिची चर्चा भारतात , निर्यातीवर परिणाम होणार

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था | महाईन्यूज**

**अर्थमंत्री निर्मला सितारमण यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी जीएसटी काउंसिलची 56वी बैठक पार पडली. या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. जीएसटीतील 12 आणि 28 टक्के हे स्लॅब काढून टाकले आहेत. त्याचा सकारात्मक परिणाम दिसून येणार आहे. त्यामुळे अनेक वस्तू स्वस्त होणार आहेत. आता फक्त 5 आणि 18 टक्के जीएसटी स्लॅब असणार आहे. त्यामुळे सर्व वस्तू या दोन स्लॅबच्या आतच बसणार आहे. म्हणजेच 28 टक्के जीएसटी असलेली वस्तू 18 टक्क्यांपर्यंत येणार आहे. त्यामुळे त्याचा फायदा थेट ग्राहकांना होणार आहे. दुसरीकडे लक्झरी आणि आरोग्याला हानिकारक असलेल्या वस्तूंसाठी एक वेगळा स्लॅब तयार केला आहे. हा 40 टक्के असणार आहे. युएचटी दूध, पनीर, पिझ्झा ब्रेड, रोटी, पराठा आता शून्य जीएसटी स्लॅबमध्ये असतील. त्यामुळे सर्व सामन्य नागरिकांना दिलासा मिळणार आहे. नव्या बदलाची अमलबजावणी 22 सप्टेंबर 2025 पासून लागू होणार आहे. अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी ही माहिती दिली आहे.**




एसी, वॉशिंग मशीन, 38 इंचापेक्षा मोठे टीव्ही, लहान कार इत्यादींवर आता 18 टक्के जीएसटी आकारला जाईल, तर पूर्वी त्यावर 28 टक्के जीएसटी आकारला जात होता. पान मसाला, सिगारेट, गुटखा आणि इतर तंबाखूजन्य पदार्थ, विडी यांना विशेष श्रेणीत ठेवण्यात आले असून 40 टक्के जीएसटी असणार आहे.. फ्लेवर्ड कार्बोनेटेड पेये देखील या स्लॅबमध्ये ठेवण्यात आली आहेत. अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी सांगितलं की, पंतप्रधान मोदींनी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात याबाबतचा सूतोवाच केला होता. पंतप्रधान ज्या सुधारणांबद्दल बोलले होते त्या दिशेने आम्ही काम केले आहे. सर्व राज्यांच्या अर्थमंत्र्यांनी दर सुसूत्रीकरणात सहकार्य केले आणि आम्ही हा निर्णय एकमताने घेतला आहे.

### काय स्वस्त होणार

आरोग्य उपकरणे आणि 33 औषधांवर जीएसटी आकारला जाणार नाही. चष्मा आणि दृष्टीशी संबंधित उपकरणांवरही 5 टक्के जीएसटी असेल.सुक्या मेव्यांवरील म्हणजेच काजू, बदाम, पिस्ता, खजूर, मिश्र काजू, नारळ पाणी, सोया मिल्क ड्रिंक, फळांच्या रसावर आधारित पेय, दुधावर आधारित पेय यासारख्या पॅकेज्ड पेय, पास्ता, नूडल्स, कॉर्नफ्लेक्स, फ्रूटेड राईस, बिस्किटे, केक, पेस्ट्री, नमकीन, भुजिया, इत्यादींवरील जीएसटी दर 12 टक्क्यांवरून वरून 5 टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. संगमरवरी, चामडे, शेतकरी आणि त्यांच्या उत्पादनांवर आकारण्यात येणारा 12 टक्के जीएसटी देखील 5 टक्के करण्यात आला आहे. आरोग्य विमा आणि जीवन विमा पॉलिसींवरील जीएसटीमध्येही मोठी सवलत देण्यात आली आहे. शूज आणि कपड्यांवरही मोठी सवलत देण्यात आली आहे. आता त्यावर 12 टक्क्यांऐवजी फक्त 5 टक्के जीएसटी आकारला जाईल.

### काय महाग होणार

लक्झरी वस्तू, कार आणि बाईक अधिक महाग होतील. कारण नव्या स्लॅबमध्ये यांना विशेष स्लॅब देण्यात आला आहे. तंबाखू, जर्दा, पान मसाला, फ्लेवर, फ्रूट ड्रिंक आणि इतर पॅकेज्ड पेये महाग होतील. 350 सीसी पेक्षा जास्त इंजिन असलेल्या बाईक महाग होतील.

### 2500 रूपयांपर्यंतच्या 'या' वस्तू स्वस्त होणार

देशातील सर्वसामान्य जनतेसाठी आनंदाची बातमी आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली जीएसटी परिषदेच्या 56 व्या बैठकीला सुरुवात झाली आहे. दोन दिवस चालणाऱ्या या बैठकीच्या पहिल्या दिवशी महत्वाची माहिती समोर आली आहे. 12 टक्के आणि 28 टक्के स्लॅब काढून टाकण्यात आले आहेत. या स्लॅबची जागा आता अनुक्रमे 5 टक्के आणि 18 टक्के या स्लॅबने घेतली आहे. याबाबत अधिकृत घोषणा लवकरच होणार आहे. यामुळे दररोजच्या जीवनातील बऱ्याच वस्तू स्वस्त होणार आहेत. याबाबत माहिती जाणून घेऊयात.

### कपडे आणि चप्पल स्वस्त होणार

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार जीएसटी कौन्सिलने 2500 रुपयांपर्यंतच्या चपला आणि कपडे यांचा समावेश 5 टक्के स्लॅबमध्ये ठेवण्याचा निर्णय घेतला. आतापर्यंत फक्त 1000 रुपयांपर्यंतच्या चपला आणि कपड्यांवर 5 टक्के कर आकारला जात होता, तसेच त्यापेक्षा जास्त किमतीच्या उत्पादनांवर 12 टक्के कर आकारला जात होता. मात्र आजच्या बैठकीत 2500 रुपयांपर्यंतच्या चपला आणि कपडे आता स्वस्त होणार आहेत.

### 12 आणि 28 टक्के स्लॅब रद्द

मनीकंट्रोलने दिलेल्या बातमीनुसार, 12 आणि 28 टक्के कर स्लॅब रद्द करण्यात आला आहे. या दोन्ही श्रेणींमधील वस्तू आता पाच आणि 18 टक्के कर स्लॅबमध्ये सामील करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर जीएसटी कौन्सिलने लहान व्यवसायांना दिलासा देण्यासाठी इतरही अनेक सुधारणांना मान्यता दिली आहे. यात धोकादायक नसलेल्या व्यवसायांसाठी नोंदणी प्रक्रिया तीन दिवसांपर्यंत कमी करण्यात आल्याचा समावेश आहे.

यावर बोलतामा जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला म्हणाले की, जीएसटी नियमांमधील या सुधारणांमुळे केंद्रशासित प्रदेशाचा महसूल 10 ते 12 टक्क्यांनी कमी होण्याची शक्यता आहे. कारण पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर राज्याचा महसूल आधीच कमी झाला आहे, त्यानंतर आता जीएसटीमुळेही राज्याला फटका बसण्याची शक्यता आहे.

## राज्य सरकारचा महसूल कमी होणार

सरकारच्या निर्णयावर विरोधी पक्षशासित हिमाचल प्रदेश, झारखंड, कर्नाटक, केरळ, पंजाब, तामिळनाडू, तेलंगणा आणि पश्चिम बंगाल या राज्यांनी यामुळे होणाऱ्या महसूलाच्या नुकसानाची भरपाई देण्याची मागणी केली आहे. झारखंडचे अर्थमंत्री राधा कृष्ण किशोर म्हणाले की, जर केंद्राचा जीएसटी सुधारणा प्रस्ताव लागू झाला तर त्यांच्या राज्याला 2000 कोटी रुपयांचे महसुली नुकसान होईल. केंद्राने आम्हाला नुकसान भरपाई दिली तर हा निर्णय लागू करण्यास हरकत नाही. दरम्यान जीएसटी परिषदेच्या बैठकीत राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे अर्थमंत्री देखील सहभागी झाले आहेत.

**दोन स्थानके** बालाजीनगर स्थानकांना मंजुरी; ६८३.११ कोटी खर्चाला मान्यता

# कात्रज मेट्रो मार्गिकेवर दोन स्थानके!

## आता पाच स्थानके होणार

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या (महामेट्रो) स्वारगेट ते कात्रज या ५.१ किलोमीटर भुयारी मेट्रो मार्गिकेवर बालाजीनगर आणि बिबवेवाडी या दोन स्थानकांच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी मंजुरी दिली. तसेच या प्रकल्पासाठी अतिरिक्त ६८३.११ कोटी रुपयांच्या खर्चासही तत्त्वत: मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातील या प्रकल्पाच्या मार्गिकेवर आता पाच स्थानके होणार आहेत.**



बालाजीनगर आणि बिबवेवाडी येथील स्थानकांसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिक गेल्या काही वर्षांपासून सातत्याने मागणी करत होते. या मागणीला यश आले आहे. या मार्गिकेमुळे दक्षिण भागातील वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार आहे.'या मेट्रो स्थानकामुळे प्रवासाचा वेळ आणि खर्च दोन्ही कमी होणार आहे. तसेच वाहतूक कोंडीतून सुटका होणार आहे.' अशी प्रतिक्रिया धनकवडीतील शुभदा धुमाळ यांनी दिली.'गेल्या अनेक महिन्यांपासून या प्रकल्पाच्या स्थानकांबाबत आणि अतिरिक्त खर्चाबाबत पाठपुरावा आणि अभ्यास सुरू होता.स्थानिक मागण्यांचा विचार करून या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. पुणे शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या सोयीसाठी मेट्रो प्रकल्प हा अत्यंत महत्त्वाचा आहे. नवीन स्थानकांमुळे दक्षिण पुण्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळेल.महामेट्रोकडून या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया पार पाडण्यात आली असून, सहा कंपन्यांनी सहभाग नोंदविला होता. तांत्रिक आणि कार्यक्षमतेच्या पातळीनुसार एका कंपनीची नियुक्ती करण्यात येत असून वित्त पुरवठासंदर्भात प्रक्रिया पार पाडून लवकरच या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येणार आहे.गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी असलेल्या पुणे ते

## उपनगरीय रेल्वेच्या दोन मार्गिका

महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या (महामेट्रो) स्वारगेट ते कात्रज या ५.१ किलोमीटर भुयारी मेट्रो मार्गिकेवर बालाजीनगर आणि बिबवेवाडी या दोन स्थानकांच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी मंजुरी दिली. पुणे-लोणावळा तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेमुळे रेल्वे प्रवाशांचा वाढता ताण कमी होऊन उपनगरीय रेल्वे सेवांची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.


लोणावळा दरम्यान उपनगरीय रेल्वेच्या तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेला गती मिळणार आहे. या प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या आर्थिक सहभागाला राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या प्रकल्पाचा खर्च अंदाजे पाच हजार १०० कोटी रुपयांचा असून पाच वर्षांत प्रकल्प पूर्ण केला जाणार आहे. Mसध्या पुणे-लोणावळा लोकलच्या दिवसभरात ६०.५९ किलोमीटर अंतर कापत दररोज लाखो प्रवाशांची ने-आण करीत ४४ फेऱ्या होतात. या मार्गावर असणाऱ्या लांब पल्ल्यांच्या गाड्यांचा ताण लक्षात घेता उपनगरीय सेवेसाठी स्वतंत्र मार्गाची अनेक वर्षांपासून मागणी केली जात होती. या नव्या मार्गिकेमुळे गर्दी आणि विलंब कमी होईल. मुंबई रेल्वे विकास महामंडळामार्फत सादर करण्यात आलेल्या पुणे ते लोणावळा दरम्यान उपनगरीय रेल्वेच्या तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेच्या या प्रकल्पाचा एकूण खर्च पाच हजार १०० कोटी रुपये आहे. त्यामध्ये जमीन अधिग्रहण खर्चाचाही समावेश आहे. यातील ५०.५० टक्के आर्थिक सहभागाची जबाबदारी केंद्र सरकार व राज्य शासन उचलणार आहे. राज्य शासनाचा एकूण वाटा दोन हजार ५५० कोटी रुपये इतका निश्चित करण्यात आला आहे. राज्य शासनाच्या हिश्श्यातील या दोन हजार ५५० कोटींपैकी पुणे महापालिका ५१० कोटी, पिंपरी-चिंचवड महापालिका ५१० कोटी आणि पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) ७६५ कोटी रुपयांचा हिस्सा असणार आहे. उर्वरित ७६ कोटींची रक्कम राज्य शासन देणार आहे.पुणे, शिवाजीनगर, खडकी, दापोडी, कासारवाडी, पिंपरी, चिंचवड, आकुर्डी, देहूरोड, बेगडेवाडी, घोरावाडी, तळेगाव, वडगाव, कान्हे, कामशेत, मळवली, लोणावळा अशी ६०.५९ किलोमीटर अंतरावर १७ स्थानके आहेत.

# सर्वच उमेदवारांची चारित्र्य पडताळणी

## उमेदवारांकडून शपथपत्र घेण्याचेही स्पष्ट निर्देश देण्यात आले

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात पवित्र प्रणालीद्वारे राबवण्यात येत असलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेंतर्गत शिक्षणसेवक पदावर नियुक्तीसाठी सर्वच उमेदवारांची चारित्र्य पडताळणी केली जाणार आहे. शिक्षक पात्रता परीक्षा २०१९ (टीईटी) गैरप्रकारात उमेदवारावर गुन्हा नोंदविण्यात आल्याचे किंवा सहआरोपी असल्याचा अहवाल आल्यास नियुक्ती न देण्याबाबत, तसेच उमेदवारावर गुन्हा नोंदवला**



नसल्यास किंवा सहआरोपी असल्याचा अहवाल नसल्यास उमेदवारांकडून शपथपत्र घेण्याचेही स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.शालेय शिक्षण विभागाचे अवर सचिव शरद माकणे यांनी या संदर्भातील निर्देश शिक्षण आयुक्तांना परिपत्रकाद्वारे दिले. टीईटी २०१९मधील गैरप्रकारांच्या अनुषंगाने पुण्यातील सायबर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या प्रकरणाच्या तपासात ज्या उमेदवारांची नावे आढळून आली आहेत, ज्यांनी सीटीईटी किंवा बीएड या आधारावर शिक्षक अभियोग्यता आणि

## भविष्यात गुन्हा दाखल झाल्यास...

असल्याबाबत अहवाल प्राप्त झाल्यास त्यास नियुक्ती देण्यात येऊ नये. उमेदवारावर अद्याप गुन्हा नोंदविण्यात आलेला नाही अथवा त्यास सहआरोपी करण्यात आलेले नाही, असा अहवाल प्राप्त झाल्यास नोटरी केलेले शपथपत्र उमेदवाराने सादर केल्यास त्यास शिक्षणसेवक पदावर नियुक्ती देण्याची कार्यवाही नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी करावी,' असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

बुद्धिमत्ता चाचणी (टेट) २०२२ ही परीक्षा उत्तीर्ण केली आहे, ज्यांनी शिक्षणसेवक पदावर नियुक्ती मिळावी म्हणून उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांवर न्यायनिर्णय पारित झाले आहेत, त्या उमेदवारांबाबत काय कार्यवाही करायची याबाबतचे स्पष्टीकरण या परिपत्रकाद्वारे देण्यात आले आहे.'सर्व उमेदवारांनी सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर यांच्याकडून चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त करून घ्यावा. त्यासाठी नियुक्ती अधिकाऱ्यांनी आवश्यक तो पाठपुरावा करावा. उमेदवारांवर गुन्हा नोंदविण्यात आल्याचे किंवा त्यास सहआरोपी केले .

भाजपा आमदार महेश लांडगे यांचे ‘व्हीजन-2020’ ‘एज्युकेशन हब पिंपरी-चिंचवड’

# ‘आयआयएम’ उभारणीचा मार्ग मोकळा!

## एज्युकेशन हब पिंपरी-चिंचवड : मोशीतील 70 एकर जागा निश्चितीचा GR प्रसिद्ध

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**उद्योगनगरी पिंपरी-चिंचवडमध्ये आयआयएम उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. मौजे मोशी, ता. हवेली, जि. पुणे येथील ग.नं. ३२७ (जुना ग.नं. ३२५) मधील ७७ हे. ०१ आर पैकी २८.०० हे. आर जमीन भारतीय प्रबंध संस्थान (IIM) नागपूर प्रशिक्षण आणि शिक्षण केंद्र उभारणे या प्रयोजनासाठी यांना प्रदान करण्यात आले. त्याचा अध्यादेश आज दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध झाला आहे.**



भाजपा आमदार महेश लांडगे यांनी ‘व्हीजन-2020’ मध्ये ‘एज्युकेशन हब पिंपरी-चिंचवड’ असा संकल्प केला होता. त्यामध्ये आयआयएम आणि आयआयटी सारख्या संस्थांची केंद्र शहरात सुरू करण्यासाठी पाठपुरावा केला जात आहे.

‘आयआयएम’ नागपूरचे संचालक भीमराया मैत्री म्हणाले की, “पुणे हे एक प्रमुख उत्पादन व आयटी केंद्र आहे.

आजच्या बदलत्या जगात कार्यकारी अधिकाऱ्यांना नव्याने कौशल्य मिळवून देणे आणि आधीच्या कौशल्यांचा पुनर्विकास करणे आवश्यक आहे. उद्योग आमच्याकडे येण्याऐवजी, आम्हीच त्यांच्याकडे जाऊन त्यांच्या गरजा पूर्ण करत आहोत.”

सध्या आयआयएम नागपूर पुण्यात काम करणाऱ्या व्यावसायिकांसाठी विकेंड एमबीए कार्यक्रम चालवते. जो मोशी कॅम्पस सुरू झाल्यावर तिथे स्थलांतरित केला जाईल. संस्थेचे गोवा, हैदराबाद आणि दक्षिण आशियाई देशांमध्येही विस्तार करण्याचे नियोजन आहे.

पुण्यातील नव्या कॅम्पसमध्ये एक इनक्युबेशन सेंटर असणार आहे, तसेच उद्योगातील व्यावसायिकांसाठी खास तयार करण्यात आलेले पार्ट-टाईम आणि विकेंड अभ्यासक्रमही असतील.

> “ पुण्यातील कॅम्पस DATA SCIENCE आणि MANAGEMENT मध्ये एक प्रमुख कार्यक्रम सुरू करणार आहे — हा कोणत्याही आयआयएमचा मुख्य कॅम्पसच्या बाहेर सुरू होणारा पहिलाच उपक्रम असेल. “चाकण, तळेगाव, भोसरी, रांजणगाव एमआयडीसी आणि हिंजवडी आयटी पार्क यांसारख्या औद्योगिक केंद्रांच्या जवळ असल्यामुळे मोशीची निवड करण्यात आली. आम्ही सात-आठ ठिकाणांचा विचार करून ही निवड केली आहे.
> **-भीमराया मैत्री,** संचालक, आयआयएम नागपूर.

> “ पिंपरी-चिंचवडमधील शैक्षणिक क्षेत्रासाठी आजचा दिवस अत्यंत अभिमानास्पद आहे. उद्योगनगरी, कामगार नगरी, आयटी हब आणि आता एज्युकेशन हब म्हणून शहराची ओळख निर्माण होते आहे. जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ, संविधान भवन व आंतरराष्ट्रीय दर्जाची लायब्ररी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संशोधन केंद्र आणि आता आयआयएम सुरू होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आपले शहर शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचाल करीत आहे.
> **-महेश लांडगे, , आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# आपत्कालीन सेवांना मिळणार बळकटी

## वायसीएम रुग्णालयात अत्याधुनिक ट्रायेज व पुनर्जीवन सुविधा कार्यान्वित

**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयाने आपत्कालीन विभागात अत्याधुनिक रुग्ण निवड आणि पुनर्जीवन सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. यामुळे आपत्कालीन सेवांना बळकटी मिळणार आहे. डाना टीएम फोर इंडिया लिमिटेड यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.**



पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते या नवीन सुविधांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी डाना टीएम फोर इंडिया लिमिटेडचे प्लांट हेड शिवाजी निळकंठ, एचआर व प्रशासन विभागाच्या प्रमुख योगिता सुषीर यांच्यासह रुग्णालयातील डॉक्टर्स, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नियोजित ट्रायेज सुविधेमुळे रुग्णांच्या प्रकृतीच्या गंभीरतेनुसार त्यांचे जलद मूल्यमापन आणि प्राधान्यक्रम ठरविणे शक्य होणार आहे. तर पुनर्जीवन सुविधेमुळे आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यास मदत होणार आहे. गंभीर आजारी रुग्णांना जलद, प्रणालीबद्ध आणि उच्च गुणवत्तेची सेवा देण्यासाठी या सुविधा उपयुक्त ठरणार आहेत.

> “ डाना टीएम फोर इंडिया लिमिटेड यांच्या सहकार्याने या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. तातडीच्या वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असलेल्या रुग्णांची सेवा करण्याच्या रुग्णालयाच्या क्षमतेत यामुळे नक्कीच वाढ होईल.
> **-डॉ. राजेंद्र वाबळे,** अधिष्ठाता, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

> “ शहरी तसेच ग्रामीण भागातील गरीब, बेघर आणि रोजगारासाठी राज्यातील इतर तसेच परराज्यातून आलेल्या रुग्णांना तातडीची मदत देण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय अविरत काम करते. या रुग्णालयाला सीएसआर फंडातून मदत करता आल्याचा खूप आनंद होत आहे.
> **-शिवाजी निळकंठ,** प्लांट हेड, डाना टीएम फोर इंडिया लिमिटेड

# विज्ञानाची साथ आणि विकासाची वाट...



भूमिका

**प्रयत्नवादाची कास धरण्यास प्रवृत्त करते ते विज्ञान. आजच्या वैज्ञानिक संशोधनांचा आधार घेऊन उद्याचे जीवन सुकर करते ते तंत्रज्ञान. यंत्रगतीचे विसावे शतक असो की तंत्रप्रगतीचे एकविसावे शतक, विज्ञान तंत्रज्ञानाचा पाया ज्या देशांनी भक्कम केला, त्यांनी शाश्वत विकासाची फळे लवकर चाखली.**

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या आघाडीवर भारताने गेल्या दशकात लक्षणीय प्रगती साधली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, खगोलविज्ञान, अक्षय ऊर्जा, सेमी कंडक्टर, हवामान संशोधन, अवकाश संशोधन, जैवतंत्रज्ञान आदी क्षेत्रांवर आपण विशेष लक्ष केंद्रित केले आहे. मंगळयान, चांद्रयान-३, कोविड साथीच्या काळात कोविडची लस, डिजिटल स्टॅक किंवा ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्राच्या स्वदेशी विकासासह विविध क्षेत्रांमध्ये भारताने केलेल्या मोठ्या प्रगतीचे जगभरात प्रचंड कौतुक झाले. जागतिक स्तरावर विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला अग्रस्थानी नेण्यासाठी सरकारने नुकतीच महत्त्वाची दोन धोरणे जाहीर केली. वैज्ञानिक आणि जैवतंत्रज्ञान उत्कृष्टतेच्या प्रवासातील मैलाचे दगड ठरावेत अशा या योजना म्हणजे 'विज्ञान धारा' आणि 'बायो ई-३'. संशोधन, विकास आणि नाविन्यपूर्ण पायाभूत सुविधा निर्माण करून या योजनांच्या अंमलबजावणीसाठी सुमारे १०.५७९.८४ कोटी रुपयांची



तरतूद करण्यात आली आहे. विज्ञान धारा योजना विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा वाढवण्यावर व विविध क्षेत्रांमध्ये इनोव्हेशन अर्थात नवोन्मेषास चालना देण्यावर लक्ष केंद्रित करते. तर बायो ई३ योजना, हवामान बदल, अन्न सुरक्षा आणि आरोग्य आव्हानांचा सामना करण्यासाठी बायोमॅन्युफॅक्चरिंग म्हणजेच जैव उत्पादनात क्रांती घडवून आणण्यासाठी सज्ज आहे. हे उपक्रम एकत्रितपणे आर्थिक आणि पर्यावरणीय पैलूंमध्ये समतोल राखण्यास मदत तर करतीलच पण त्याचबरोबर शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासातदेखील लक्षणीय योगदान देतील.या योजनेअंतर्गत मूलभूत संशोधन, शाश्वत ऊर्जा, पाणी यासारख्या अतिमहत्वाच्या क्षेत्रांमध्ये संशोधनाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला जात आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे क्षेत्र बळकट करून देशाच्या संशोधन व विकासाच्या पायाचा विस्तार करण्यासाठी मनुष्यबळ तयार करण्यातदेखील योगदान मिळेल. विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेषमध्ये महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. अगदी शालेय पातळीपासून ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व स्तरांवर, नवकल्पनांना प्रोत्साहन देण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना अधिक जोर मिळणार आहे. विज्ञान धारा अंतर्गत संशोधन उपक्रम तसेच नाविन्यपूर्ण प्रकल्पांसाठी निधी आणि अनुदान प्रदान करण्यात येणार आहे. औद्योगिक आणि शैक्षणिक संस्थांमधील संयुक्त संशोधन उपक्रम आणि सहयोगात्मक प्रकल्पांची अंमलबजावणी ही योजना करणार आहे. स्टार्ट-अप्स, उद्योजक आणि नवसंशोधकांसाठी विशेष नवोन्मेष केंद्रे देशभर स्थापन केली जातील. या योजनेमुळे जागतिक संशोधन संस्थांशी ज्ञानाची देवाणघेवाण आणि संयुक्त प्रकल्पांद्वारे आंतरराष्ट्रीय संशोधन सहकार्य सुलभ होणार आहे. तरुण संशोधकांची प्रतिभा विकसित करून क्षमता बांधणीच्या दृष्टीने त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी अनुभवी शास्त्रज्ञांशी जोडण्याचा उपक्रम हाती घेतला जाणार आहे. हवामान बदलामुळे होणाऱ्या विपरीत परिणामांची तीव्रता कमी करणे, अन्न सुरक्षा आणि मानवी आरोग्य यासारख्या काही गंभीर सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी, जीवशास्त्राच्या औद्योगिकीकरणात गुंतवणूक करण्याची आज नितांत गरज आहे. जैव-आधारित कच्चा माल वापरून प्रगत जैवतंत्रज्ञान प्रक्रियांद्वारे जैव-उत्पादननिर्मिती होते. बायो ई-३ योजनेचे उद्दिष्ट इकॉनॉमी, एन्व्हायर्नमेंट व एम्प्लॉयमेंट अर्थात अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि रोजगार या प्रमुख क्षेत्रांमध्ये समतोल राखून भारताला जागतिक जैवतंत्रज्ञान शक्तिस्थानात रूपांतरित करणे हे आहे. त्यासाठी मजबूत जैव उत्पादन परिसंस्था उभारून नवकल्पनांद्वारे जैव-आधारित उत्पादने विकसित करणे ही संकल्पना आहे. जैवउत्पादन क्षेत्रांमध्ये संशोधन, विकास आणि उद्योजकता यांना नवोन्मेष-आधारित पाठबळ समाविष्ट आहे

## प्रासंगिक »

### जरांगे जिंकले

***जे निर्णय प्रशासकीय आहेत त्यांची जबाबदारी न्यायालयांच्या खांद्यांवर टाकण्याची नवीनच प्रथा अलीकडे दिसू लागली आहे. हे असे किती काळ करत राहणार?***

मनोज जरांगे यांच्या आंदोलनामुळे आतापर्यंत मराठा आरक्षणाचा मुद्दा जितका पुढे गेलेला आहे मुंबईत काही वेगळे वा क्रांतिकारी घडेल अशी अपेक्षा फारफार तर त्यांचे कडवे समर्थक वगळता अन्यांस असण्याची शक्यता नाही. या आंदोलनाचे फलित म्हणावयाचे तर हे. जे मुंबईत गेले चार दिवस झाले त्यामुळे मराठा आरक्षण मुद्दा पुढे गेला असे ज्यांना वाटते त्यांच्या दिव्यदृष्टीस वंदन. ही अशीच विजयपताका गेल्या वर्षी जानेवारी महिन्यात जरांगे यांचे 'भगवे वादळ' इत्यादी मुंबईवर चालून येत होते त्या वेळी फडकली होती. त्या वेळी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे जरांगे यांस मुंबईच्या वेशीवर प्रभातकाली सामोरे गेले आणि तात्काळ शासकीय आदेश काढण्याच्या आश्वासनावर जरांगे आपल्या तलवारी म्यान करून माघारी फिरले. त्या सरकारी आदेशाचे काय झाले.

**तीस दिवसांपेक्षा जास्त काळ कोणत्याही 'गंभीर' आरोपांसाठी न्यायालयीन कोठडीत राहिल्यानंतर पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि इतर मंत्र्यांना बडतर्फ करण्यासाठी संविधान दुरुस्ती विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवले गेले. येत्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच आठवड्यात त्यांना आपला अहवाल सादर करावा लागेल.**

## राजकीय विरोधक संपवायचे आहेत

त्यानंतर हे विधेयक मंजूर करण्याची प्रक्रिया सुरू होईल, पण सरकारसाठी हे विधेयक मंजूर करणे सोपे होईल की याबाबत प्रखर विरोधामुळे सरकारला विधेयकपासून माघार घ्यावी लागेल हे पुढील अधिवेशनातच कळेल.या विधेयकाच्या प्रस्तावाभोवती समर्थनाची आणि विरोधाची तीव्र लाट उसळली आहे. कुणी याला लोकशाहीतील नैतिकता टिकवण्याचे साधन म्हणत आहे, तर कुणी याला केंद्र सरकारचा राजकीय सूडबुद्धीचा प्रयत्न म्हणून पाहात आहे.सरकारमार्फत संसदेमध्ये २० ऑगस्ट रोजी याबद्दलचे '१३० वी घटनादुरुस्ती विधेयक' मांडताना, 'देशातील राजकारण स्वच्छ आणि नैतिकताधारित करण्याच्या उद्देशाने हे विधेयक सादर होते आहे' असे सांगण्यात आले. लाचखोरी आणि इतर गंभीर गुन्ह्यांच्या आरोपांसाठी पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा इतर मंत्र्यांना जर सलग ३० दिवस न्यायालयीन कोठडीत काढावे लागले, तर त्यांची पदावरून आपोआप हाकालपट्टी करण्याची तरतूद या



घटनादुरुस्तीत आहे. या कायद्याचा गैरवापर होऊ शकतो ही विरोधकांची भीती आहे. एवढेच नव्हे तर 'इंडिया आघाडी'ने असा आरोप केला आहे की, विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यात स्वतःची सत्ता आणता यावी या हेतूने सरकारने हा कायदा केला आहे.या विधेयकाची खोलात जाऊन चर्चा करण्याआधी आजच्या संसदेतील सत्ताधाऱ्यांबरोबरच विरोधी बाकावरील खासदारांची संख्या लक्षात घ्यावी लागेल. संविधान दुरुस्ती विधेयक मंजूर करण्यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये विशेष बहुमत आवश्यक असते. संविधानानेच अनुच्छेद ३६८ नुसार घटनादुरुस्तीसाठी दंडक घालून दिले आहेत, त्यातील लोकसभा आणि राज्यसभेत दोन पातळ्यांवर बहुमत आवश्यक आहे. एकूण सदस्यांचे बहुमत (म्हणजे सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या ५० टक्के पेक्षा जास्त) आणि दुसरे, उपस्थित व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या दोन तृतीयांश बहुमत. सध्या लोकसभेत ५४२ सदस्य आहेत. किमान २७२ खासदारांनी (एकूण बहुमत) संसदेत हजर राहाणे विधेयक मंजुरीसाठी आवश्यक आहे. शिवाय उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या दोन तृतीयांश खासदारांचा पाठिंबा आवश्यक आहे. म्हणजेच, सर्व ५४२ खासदार जर उपस्थित असतील तर विधेयक मंजूरीसाठी किमान ३६१ खासदार खासदार आवश्यक आहे. कार्यपालिका आणि न्यायपालिका या लोकशाहीच्या दोन स्तंभातील अधिकारांचा मुद्दाही या विधेयकामुळे चर्चेला आला आहे. कायदा करणे हे कार्यपालिकेचे म्हणजे सरकारचे काम; तर या कायद्यांनुसार एखादा आरोपी दोषी आहे किंवा नाही कसे हे ठरवणे हे न्यायालयाचे काम आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

जीआरला विरोध

## भुजबळांचं विधान; ओबीसी नेत्यांना केलं 'हे' आवाहन

# जीआरविरोधात न्यायालयात जाणार!

## निर्णयामुळे ओबीसी समाज नाराज

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत आंदोलन केलं. त्यांच्या आंदोलनानंतर राज्य सरकारने जवळपास सर्व मागण्या मान्य केल्यानंतर जरांगे यांनी उपोषण सोडलं. जरांगे पाटील यांच्या मागणीनुसार हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा शासन निर्णय सरकारने जारी केला. मात्र, या निर्णयामुळे ओबीसी समाज नाराज झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.**



दरम्यान, मराठा आरक्षणाच्या संदर्भातील राज्य सरकारच्या जीआरविरोधात उच्च न्यायालयात जाणार असल्याचा इशारा ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी दिला आहे. तसेच सध्या ओबीसी नेत्यांकडून सुरू असलेले आंदोलन आणि जीआर फाडणं थांबवावं, असं आवाहन छगन भुजबळ यांनी ओबीसी कार्यकर्त्यांना केलं आहे. मराठा आरक्षणाबाबत मंगळवारी महाराष्ट्र सरकारने एक जीआर जारी केला आहे. या जीआरमध्ये असलेल्या काही शब्दांमध्ये अजूनही संभ्रम आहे. त्यामुळे ओबीसींच्या अनेक संघटनांनी राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देणे, काही ठिकाणी मोर्चे, तसेच अनेक ठिकाणी शासन निर्णयाची होळी असं सर्व सुरू आहे. मात्र, इतर जे ओबीसींचे नेते आहेत त्यांच्याशी देखील मी चर्चा करत आहे", असं छगन भुजबळ यांनी म्हटलं. आपल्याला कल्पना आहे की आता गणपती उत्सव सुरू आहे. सध्या अनेकांच्या घरी गणपतीमुळे अनेक कार्यक्रम असतात. काही ठिकाणी उपोषण देखील सुरूआहेत.

मात्र, माझी सर्वांना विनंती आहे की जे कायदेतज्ञ आहेत त्यांना हे सर्व कागदपत्र देऊन या संदर्भात जे काही संभ्रम आहेत त्याबाबत वकिलांकडून आम्ही माहिती समजून घेत आहोत. आवश्यकता असेल तर आम्ही उच्च न्यायालयात जाण्याची आमची तयारी आहे. पण त्यासाठी अनेक कागदपत्र जमा करावे लागतात. आम्ही त्याबाबत वकिलांशी आणि तज्ञांशी चर्चा करत आहोत", असं छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे.माझी सर्व ओबीसी नेत्यांना विनंती आहे की सर्वांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन द्यावेत. मात्र, ते सोडून बाकी जे काही सुरू आहे, म्हणजे कोणी उपोषण करतंय, कोणी जीआर फाडत आहे. मला असं वाटतं की आपण तुर्तास या सर्व गोष्टी थांबवा. असं छगन भुजबळ यांनी माध्यमांशी संवाद साधताना म्हटलं आहे.दरम्यान,

### तुर्तास या सर्व गोष्टी थांबवा

.माझी सर्व ओबीसी नेत्यांना विनंती आहे की सर्वांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन द्यावेत. मात्र, ते सोडून बाकी जे काही सुरू आहे, म्हणजे कोणी उपोषण करतंय, कोणी जीआर फाडत आहे. मला असं वाटतं की आपण तुर्तास या सर्व गोष्टी थांबवा. आम्ही अभ्यास करून योग्य तो निर्णय घेणार आहोत", असं छगन भुजबळ यांनी माध्यमांशी संवाद साधताना म्हटलं आहे.

मराठा आरक्षणाच्या संदर्भातील राज्य सरकारच्या जीआरविरोधात उच्च न्यायालयात जाणार असल्याचा इशारा ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी दिला आहे. तसेच सध्या ओबीसी नेत्यांकडून सुरू असलेले आंदोलन आणि जीआर फाडणं थांबवावं, असं आवाहन छगन भुजबळ यांनी ओबीसी कार्यकर्त्यांना केलं आहे. मराठा आरक्षणाबाबत मंगळवारी महाराष्ट्र सरकारने एक जीआर जारी केला आहे. या जीआरमध्ये असलेल्या काही शब्दांमध्ये अजूनही संभ्रम आहे. त्यामुळे ओबीसींच्या अनेक संघटनांनी राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देणे, काही ठिकाणी मोर्चे, तसेच अनेक ठिकाणी शासन निर्णयाची होळी असं सर्व सुरू आहे. मात्र, इतर जे ओबीसींचे नेते आहेत त्यांच्याशी देखील मी चर्चा करत आहे", असं छगन भुजबळ यांनी म्हटलं. आपल्याला कल्पना आहे की आता गणपती उत्सव सुरू आहे. सध्या अनेकांच्या घरी गणपतीमुळे अनेक कार्यक्रम असतात. काही ठिकाणी उपोषण देखील सुरूआहेत. मात्र, माझी सर्वांना विनंती आहे की जे कायदेतज्ञ आहेत त्यांना हे सर्व कागदपत्र देऊन या संदर्भात जे काही संभ्रम आहेत त्याबाबत वकिलांकडून आम्ही माहिती समजून घेत आहोत. आवश्यकता असेल तर आम्ही उच्च न्यायालयात जाण्याची आमची तयारी आहे. पण त्यासाठी अनेक कागदपत्र जमा करावे लागतात. आम्ही त्याबाबत वकिलांशी आणि तज्ञांशी चर्चा करत आहोत.

# कामगारांच्या कामांच्या तासांमध्ये वाढ

## दुकानात 9 तास तर कारखान्यांत 12 तास काम करण्याचा नियम...

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कामगार टंचाईवर मात करणे, उद्योगांची कार्यक्षमता वाढवणे तसेच राज्यात उद्योगस्नेही वातावरण निर्माण होवून विदेशी गुंतवणूक आकर्षित व्हावी या हेतुन राज्य मंत्रिमंडळाने कारखाने व दुकानांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कामांच्या तासात वाढ केली आहे. यापुढे दुकानामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यास प्रतिदन ९ तास तर कारखान्यात काम करणाऱ्या कामगारास प्रतिदिन १२ तास काम करावे लागणार आहे.**



कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ६५ मध्ये कारखान्यातील दैनंदिन कामाच्या तासांची मर्यादा ९ तास होती, ती आता १२ तासांपर्यंत करण्यात आली आहे. कारखान्यातील विश्रांतीसाठी सुट्टीचा कालावधी ५ तासानंतर ३० मिनिटे होता, तो आता ६ तासानंतर ३० मिनिटे करण्यात आला आहे. आठवड्याच्या कामाचा कार्याचा विस्तार कालावधी साडेदहा तासावरुन १२ तास करण्यात आला आहे.अतिकालिक (ओव्हर टाईम) कामाच्या तासाची मर्यादा

### उत्पादन खंडीत होणार नाही

नव्या नियमानुसार दुकानांमध्ये दैनंदिन कामाचे तास ९ वरुन १० तास करण्यात आले आहेत. खंडीत किंवा तातडीचे काम सोपविलेल्या कर्मचाऱ्यांचा कार्यकाल साडेदहा तासांवरून १२ तास करण्यात आला आहे. अतिकालिक (ओव्हर टाईम) कामाचा कालावधी १२५ तासांवरुन १४४ तास करण्यात आला आहे.या बदलामुळे उद्योगांची कार्यक्षमता वाढेल, उत्पादन खंडीत होणार नाही.

११५ तास प्रति तिमाही होती, ती अता १४४ तास प्रति तिमाही अशी करण्यात आली आहे. याचबरोबर महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवा शर्तींचे विनियमन) अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार २० आणि त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांना केवळ हा अधिनियम लागू राहील. २० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या आस्थापनांना नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही. यापूर्वी १० आणि त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांना नियम लागू होता.

## पुरावे मिटवले?

## किम जोंग उन यांच्या अंगरक्षकांनी सर्व पुरावे मिटवले?

# ग्लास उचलला, खुर्ची पुसली!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उत्तर कोरियाचे हुकूमशहा किम जोंग उन हे कायम कोणत्या न कोणत्या कारणांनी चर्चेत असतात. आता हुकूमशहा किम जोंग उन हे सध्या चीनच्या दौऱ्यावर आहेत. दरम्यान, जगभरातील जवळपास डझनभर राष्ट्रप्रमुखांनी चीनच्या लष्करी परेडला हजेरी लावली आहे. यामध्ये किम जोंग उन, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचाही सहभाग होता.**

### व्हिडीओमध्ये नेमकं काय?



या दरम्यान किम जोंग उन यांनी व्लादिमीर पुतिन यांच्याशी द्विपक्षीय बैठकही घेतली. या बैठकीनंतरचा एक व्हिडीओ समोर आला असून व्हिडीओची मोठी चर्चा रंगली आहे. किम जोंग उन आणि व्लादिमीर पुतिन यांची द्विपक्षीय बैठक संपल्यानंतर उत्तर कोरियाच्या सुरक्षा रक्षकांनी किम जोंग उन यांनी स्पर्श केलेल्या प्रत्येक वस्तूची साफसफाई केल्याचं दिसून आलं आहे. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.एका व्हिडीओमध्ये दिसत आहे की, किम जोंग उन यांची बैठक संपताच उत्तर कोरियाचे दोन कर्मचारी किम जोंग उन यांनी स्पर्श केलेली प्रत्येक वस्तूची साफसफाई करताना दिसून आले. यामध्ये एका कर्मचाऱ्याने किम जोंग उन ज्या खुर्चीवर बसले होते त्या खुर्चीचा मागचा भाग काळजीपूर्वक स्वच्छ केला. तसेच दुसऱ्याने पिण्याच्या पाण्याचा ग्लास एका ट्रेवर ठेवला आणि घेऊन गेला. तसेच खुर्चीसह टेबल, ग्लास यासह तेथील कोणत्याही वस्तूचा भाग स्वच्छ करायचं त्यांनी सोडलं नाही असं व्हिडीओत दिसून आलं आहे. दरम्यान, तज्ज्ञांच्या मते किम जोंग उन हे बसलेल्या ठिकाणी त्यांचा डीएनए किंवा काही पुरावा राहू नये म्हणून त्यांच्या अंगरक्षकांनी खुर्ची आणि टेबलासह तेथील सर्व वस्तू स्वच्छ केल्या असाव्यात असा अंदाज लावला व्यक्त केला आहे.

उत्तर कोरियामधील हुकूमशाह किम जोंग उन यांच्या करामती अनेकदा जगासमोर येत असतात. आताही किम जोंग उनचा असाच एक कारनामा काही दिवसांपूर्वी बीबीसी वृत्तसमूहाने समोर आणला. उत्तर कोरियामधील जनतेचे स्मार्टफोन आता सरकारद्वारे नियंत्रित करण्यात येत असल्याचे बीबीसीने पुराव्यासह दाखवले होते. यामुळे लोकांना देशाबाहेरील कोणतीही माहिती प्राप्त करता येत नाही किंवा स्वतःच्या स्मार्टफोनचा खासगी वापर करता येत नाही. २०२४ च्या अखेरीस तस्करीद्वारे उत्तर कोरियातील स्मार्टफोन मिळवून त्याची तपासणी केली. या स्मार्टफोनमध्ये अँड्रॉईडचे बदल केलेले व्हर्जन वापरले जाते. ज्याद्वारे फक्त स्थानिक इंटरनेटच फोनला जोडले जाऊ शकते. या इंटरनेटच्या माध्यमातून उत्तर कोरियाच्या सरकारला जी माहिती दाखवायची आहे, तीच वापरकर्त्याला पुरविली जाते. एवढेच नाही तर एखाद्याला फोनवर काही संदेश टाइप करायचा असेल तर सरकारला जी भाषा अपेक्षित आहे, ती आपोआप उमटली जाते.या दरम्यान किम जोंग उन यांनी व्लादिमीर पुतिन यांच्याशी द्विपक्षीय बैठकही घेतली. या बैठकीनंतरचा एक व्हिडीओ समोर आला असून व्हिडीओची मोठी चर्चा रंगली आहे. किम जोंग उन आणि व्लादिमीर पुतिन यांची द्विपक्षीय बैठक संपल्यानंतर उत्तर कोरियाच्या सुरक्षा रक्षकांनी किम जोंग उन यांनी स्पर्श केलेल्या प्रत्येक वस्तूची साफसफाई केल्याचं दिसून आलं आहे. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.एका व्हिडीओमध्ये दिसत आहे की, किम जोंग उन यांची बैठक संपताच उत्तर कोरियाचे दोन कर्मचारी किम जोंग उन यांनी स्पर्श केलेली प्रत्येक वस्तूची साफसफाई करताना दिसून आले. यामध्ये एका कर्मचाऱ्याने किम जोंग उन ज्या खुर्चीवर बसले होते त्या खुर्चीचा मागचा भाग काळजीपूर्वक स्वच्छ केला.

### मोबाइलवर हुकूमशाहाचं नियंत्रण?

दुसऱ्याने पिण्याच्या पाण्याचा ग्लास एका ट्रेवर ठेवला आणि घेऊन गेला. तसेच खुर्चीसह टेबल, ग्लास यासह तेथील कोणत्याही वस्तूचा भाग स्वच्छ करायचं त्यांनी सोडलं नाही असं व्हिडीओत दिसून आलं आहे.दरम्यान, तज्ज्ञांच्या मते किम जोंग उन हे बसलेल्या ठिकाणी त्यांचा डीएनए किंवा काही पुरावा राहू नये म्हणून त्यांच्या अंगरक्षकांनी खुर्ची आणि टेबलासह तेथील सर्व वस्तू स्वच्छ केल्या असाव्यात असा अंदाज लावला व्यक्त केला आहे.

## अमेरिकेशिवाय जगातील सर्व काही नष्ट होईल

## डोनाल्ड ट्रम्प यांचं विधान; टॅरिफबाबत पुन्हा एकदा केलं भाष्य

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प मागच्या काही महिन्यांपासून सातत्याने कोणत्या न कोणत्या मुद्यांवरून चर्चेत असतात. खरं तर ट्रम्प यांच्या व्यापार धोरणाचा जगातील अनेक देशांना मोठा आर्थिक फटका बसत असल्याची परिस्थिती पाहायला मिळत आहे. ट्रम्प हे सातत्याने भारतावर देखील टीका करत आहेत. ट्रम्प कायम जगावर आपला दबाव टाकण्याचा प्रयत्न करत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.**



असं असताना आता डोनाल्ड ट्रम्प यांचं एक विधान चांगलंच चर्चेत आलं आहे. ट्रम्प यांनी अमेरिकेच्या आर्थिक आणि जागतिक प्रभावाबद्दल एक मोठा दावा केला आहे. 'अमेरिकेशिवाय जगातील सर्व काही नष्ट होईल', असं वक्तव्य डोनाल्ड ट्रम्प यांनी मंगळवारी ओव्हल ऑफिसमध्ये पत्रकारांशी बोलताना केलं आहे. या संदर्भातील वृत्त टाईम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.डोनाल्ड ट्रम्प यांनी देशाच्या आर्थिक आणि जागतिक प्रभावाबद्दल अनेक मोठे दावे केले.राष्ट्राध्यक्ष पदाच्या पहिल्या कार्यकाळात अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या वाढीवरही सविस्तर भाष्य केलं. ट्रम्प यांनी म्हटलं की,"मी पहिल्या चार वर्षांत अर्थव्यवस्था खूप मोठी केली. परंतु नंतर बायडेन प्रशासनाने जे केलं त्यामुळे अर्थव्यवस्था बिघडू लागली."दरम्यान, अमेरिकेची आर्थिक ताकद वाढवण्यामध्ये टॅरिफची महत्वाची भूमिका असल्याचंही डोनाल्ड ट्रम्प यांनी मत मांडलं आहे. त्यांनी म्हटलं की,"टॅरिफ आणि इतर गोष्टींमुळे येणारा पैसा खूप मोठा आहे. टॅरिफमुळे आपल्याला इतर गोष्टीही मिळतात.

### न्यायालय टिप्पणीवर काय म्हटलं?

भारताच्या कर धोरणांवर पुन्हा एकदा टीका करताना त्यांनी हार्ले-डेव्हिडसनचा उल्लेख करून अनुचित व्यापार पद्धतीचं उदाहरण दिलं. ट्रम्प यांनी म्हटलं की, नवी दिल्ली जगात सर्वाधिक शुल्क लादते, तर अमेरिका भारतीय वस्तूंना कमीत कमी अडथळ्यांसह त्यांच्या बाजारपेठेत प्रवेश करण्यास परवानगी देते, असं म्हणत पुन्हा एकदा भारतावर टीका केली.

# देशभरातील 10 प्रसिद्ध गणपती!

'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया' असा गणरायाचा जयघोष संपूर्ण भारतात, विशेषतः महाराष्ट्रात, गणेशोत्सवाच्या संपूर्ण १० दिवस आणि रात्री ऐकायला मिळतो. संपूर्ण भारतात गणेशोत्सव उत्साहात साजरा केला जात असताना, महाराष्ट्रातील सार्वजनिक गणेश मंडळांचा उत्साह पाहण्यासारखा असतो. आज आम्ही भारतभरातील १० प्रसिद्ध गणपती मंडळांची माहिती देणार आहोत.

## लालबागचा राजा- लालबाग मुंबई

1 ब्रिटिश राजवटीत पहिल्यांदा 'लालबागचा राजा'ची स्थापना झाल्यापासून ८५ वर्षांहून अधिक काळ तो मुंबईत 'राज्य' करीत आहे. 'लालबागच्या राजा'ची स्थापना इ.स. १९३४ साली करण्यात आली होती. कोळी समाजाच्या नवसाला पावलेला म्हणून हा गणपती सर्वप्रथम प्रसिद्ध झाला. मुंबईतील लालबागमध्ये जुन्या काळात मुख्यत्वे विणकर आणि इतर कामगार राहत होते. हे मंडळ मुंबईतील सर्वांत सुशोभित असलेल्या मंडळांपैकी एक आहे आणि उत्सवाच्या १० दिवसांमध्ये दररोज सरासरी १५ लाख लोक येथे दर्शनासाठी येतात. लोककथा अशी आहे की, लालबागचा राजा आपल्या भक्तांच्या इच्छा पूर्ण करतो.

## दगडूशेठ हलवाई गणपती- पुणे

2 दगडूशेठ हलवाई गणपती मंडळ हे भारतातील सर्वांत जुन्या सार्वजनिक मंडळांपैकी एक आहे. कारण- १८९६ पासून येथे उत्सव साजरा केला जात आहे. दगडूशेठ हलवाई हे कर्नाटकातील मिठाई व्यापारी होते; जे पुण्यात स्थायिक झाले होते. या ठिकाणी बसवलेली गणेशमूर्ती देशातील सर्वांत महागडी म्हणून ओळखली जाते. या मूर्तीचा सुमारे एक कोटी रुपयांचा विमा उतरवण्यात आल्याचे वृत्त आहे.

## मुंबईचा राजा- गणेश गल्ली,

3 गणेश सार्वजनिक उत्सवाच्या १० दिवसांत मुंबईतील सर्व रस्ते लालबाग येथील गणेश गल्लीकडे जातात. प्रत्येक वेळी सामाजिक संदेश देणाऱ्या शास्त्रीय मूर्तीसाठी हे मंडळ प्रसिद्ध आहे. मुंबईतील सर्वांत जुने मंडळ, असा या मंडळाचा मान आहे. १९२८ मध्ये लालबागमधील गिरणी कामगारांनी गणेश गल्ली मंडळाची स्थापना केली.

## खैरताबाद गणेश- हैदराबाद


4 हैदराबाद हे सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदाने साजरे करणारे आणखी एक शहर आहे. खैरताबाद गणेश मंडळ हे परंपरेने हैदराबादमधील सर्वांत मोठे गणेश मंडळ आहे. या वर्षी ही मूर्ती जवळपास १०० फूट उंच असून, त्याची किंमत एक कोटी रुपयांपर्यंत आहे. ही मूर्ती राजस्थानातून आणलेल्या मातीपासून बनवून, सेंद्रिय रंगाने रंगवली जाते.

## कसबा गणपती- पुणे

5 कसबा गणपतीला शिवाजी महाराजांच्या काळापासूनचा इतिहास आहे. शिवरायांची आई जिजामाता यांनी हे मंदिर बांधले. हे गणेशाचे मंदिर असले तरी ते दरवर्षी सार्वजनिक मंडळाद्वारे गणेशोत्सव उत्साहात साजरा केला जातो. लोकमान्य टिळकांनी पुण्यातील सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात कसबा गणपती येथे केली. या मूर्तीला अनेक वर्षांपासून भारतातील सर्वोत्तम मूर्तींपैकी एक म्हणून स्थान देण्यात आले आहे.

## जीएसबी सेवा मंडळ गणपती– किंग्ज सर्कल, मुंबई

6 जीएसबी गणपती ही सलग अनेक वर्षांपासून भारतातील सर्वांत श्रीमंत गणेशमूर्ती आहे. दक्षिण भारतीय आणि गुजराती लोकांची वस्ती असलेल्या मुंबईतील किंग्ज सर्कल या ठिकाणी ही मूर्ती प्रतिष्ठापित केली आहे. या मंडळामध्ये दरवर्षी ६५ हजारहून अधिक लोक त्याची पूजा करतात. या सार्वजनिक गणेशमूर्तीची उत्कंठावर्धक बाब म्हणजे १० ऐवजी पाच दिवस पूजाअर्चा केली करून, उत्सवाच्या पाचव्या दिवशी विसर्जन केले जाते.



## गिरगावचा राजा– गिरगाव, मुंबई

7 खेतवाडी व गिरगाव ही गुजराती व मारवाडी लोकसंख्या असलेली व्यापारी क्षेत्रे आहेत. पण, हे समुदाय दरवर्षी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी मूळ महाराष्ट्रीयन लोकांसोबत एकत्र येतात. हे मंडळ विशिष्ट थीमसह उभारले जाते. मूर्तीची रचना सौंदर्यपूर्ण असते. या गणेशोत्सव मंडळाला 'गिरगावचा राजा' होण्याचा मान हक्काने दिला जातो.

## धरमपेठ गणेशोत्सव- नागपूर

8 नागपूरमध्ये जवळपास ६० वर्षांपासून सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जात आहे. पुणे-मुंबईसारखी मंडप व्यवस्था आणि मूर्ती तितकी मोठी नसली तरी धरमपेठ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ हे नागपूरमधील सर्वांत मोठे मंडळ आहे. भाविकांची येथे नेहमी गर्दी असते.

## नाशिकचा राजा- नाशिक

9 महाराष्ट्रातील नाशिक हे आणखी एक औद्योगिक शहर आहे. येथे अनेक वर्षांपासून गणेशोत्सव साजरा केला जातो. जरी मंडप आणि उत्सव पुण्याइतका भव्य नसला तरी नाशिकचा राजा हे नाशिकमधील सर्वोत्कृष्ट गणेशोत्सव मंडळ म्हणून ओळखले जाते. घणकर लेन, अशोकस्तंभ, नाशिक येथे या मंडळाचा उत्सव साजरा होतो. उत्सवाच्या दहाव्या दिवशी विसर्जन करण्यापूर्वी १० दिवस मूर्तीची पूजा केली जाते.

## पणजीम, गोवा-गणेशोत्सव

10 गोवा हे अनेक अर्थांनी महाराष्ट्रासारखेच आहे. गोव्यात मराठी लोकसंख्या लक्षणीय आहे. तर, गणेश चतुर्थी हा गोव्यातील लोकप्रिय सण आहे. महाराष्ट्रात हे मंडळ तितके मोठे नसले तरी गोव्यात या गणेश मंडळाचा वाटा आहे. पणजीम येथील सार्वजनिक गणेशोत्सव हे एक असे उदाहरण आहे की, जिथे गणेशमूर्ती लोकांसाठी खुल्या आहेत; ज्यामध्ये १० दिवस दररोज पूजा आणि आरती केली जाते. मडगाव व म्हापसा येथेही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आहेत.

गणेशोत्सव हा भारतातील सर्वांत मोठ्या उत्सवांपैकी एक आहे. ज्या भागात गणेशाचे मंडप आहेत, त्या भागात वाहतूक जवळपास ठप्प होते. या मंडळाच्या परिसरात १० दिवस भाविकांची प्रचंड गर्दी असते. हा सण मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यामागची प्राथमिक संकल्पना ही विविध धर्म आणि जातींतल्या लोकांमधील संबंध वाढवणे आणि एकता निर्माण करणे, अशी होती. लोकांनी आपापसांतील मतभेद दूर करून गणेश चतुर्थी एकत्रितपणे साजरी करण्याची वेळ आली आहे.

मोरया



गणेश चतुर्थी फक्त महाराष्ट्रातच साजरी केली जाते, असे अनेकांना वाटते; पण ते चुकीचे आहे. कारण- हा संपूर्ण भारताचा सण आहे. म्हणून भारताच्या अनेक भागांमध्ये गणेश चतुर्थी साजरी केली जाते; तर तमिळनाडू आणि इतर दक्षिणेकडील राज्यांमध्ये याच दिवसाला 'विनयगर चतुर्थी' म्हणून ओळखले जाते. हा सण भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील चतुर्थी तिथीला येतो. हा उत्सव १० दिवस चालतो आणि अनंत चतुर्दशी (शुक्ल पक्षाच्या १४ व्या दिवशी) गणेशमूर्तीच्या विसर्जनाने समाप्त होतो. बहुतेक लोक घरी मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करून सण साजरा करतात; तर महाराष्ट्रात मंडळामध्ये महाकाय गणपतीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून, सार्वजनिकरीत्या हा उत्सव साजरा केला जातो. त्यामुळे याला सार्वजनिक गणेशोत्सव म्हणून ओळखले जाते.

‘विराट’ फिटनेस टेस्ट

## कोहलीसाठी BCCIने नियमात केला मोठा बदल

# विराटने इंग्लंडमध्ये दिली फिटनेस टेस्ट!

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट संघातील अनेक खेळाडूंनी फिटनेस टेस्ट दिली आहे. बीसीसीआयच्या देखरेखीखाली झालेल्या फिटनेस टेस्टमध्ये वरिष्ठ खेळाडू ते नवे खेळाडू सहभागी झाले होते. पण भारताचा रनमशीन असलेल्या विराट कोहलीने मात्र इंग्लंडमध्ये फिटनेस टेस्ट दिली आहे.**

### विदेशात चाचणी देण्यामागचं कारण काय?



बीसीसीआयने विराट कोहलीला लंडनमध्ये फिटनेस टेस्ट देण्यासाठी परवानगी दिली आहे. ज्यामुळे आता विराट कोहलीला सूट का यावरून चर्चा सुरू झाल्या आहेत. बंगळुरूमधील एनसीएमध्ये गेल्या आठवड्यात २९ ऑगस्टला खेळाडूंना फिटनेस टेस्टसाठी उपस्थित राहण्यास सांगितले होते. यादरम्यान रोहित शर्मा, शुबमन गिल, जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज या खेळाडूंनी फिटनेस टेस्ट दिली होती. मात्र कोहलीला लंडनमध्ये टेस्ट देण्याकरता परवानगी दिल्याची माहिती समोर आली आहे सध्या आपल्या कुटुंबासह इंग्लंडमध्ये असलेल्या कोहलीला लंडनमध्ये देखरेखीखाली त्याची फिटनेस टेस्ट पूर्ण करण्याची परवानगी देण्यात आली. सर्व खेळाडूंसाठी सामान्यतः अपेक्षित असलेल्या प्रोटोकॉलमुळे विराटसाठी बदलण्यात आलेल्या निर्णयाने अनेकांच्या भुवया उंचावल्या.कसोटी आणि टी-२० मधून निवृत्त झालेला विराट कोहली आता फक्त एकदिवसीय सामन्यांसाठी उपलब्ध असणार आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये ऑस्ट्रेलिया दौऱ्यात एकदिवसीय मालिकेत कोहली पुन्हा एकदा क्रिकेटच्या मैदानावर दिसू शकतो. विराट कोहलीच्या फिटनेस टेस्टचा अहवाल फिजिओने बीसीसीआयला पाठवला आहे. बीसीसीआयच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने विराट कोहलीसाठी दिलेल्या खास निर्णयाबाबत वक्तव्य केलं नाही, परंतु त्यांनी म्हटलं की कोहलीने विदेशात टेस्ट घेण्यासाठी “पूर्व परवानगी घेतली असावी”. पण या घटनेमुळे भविष्यात इतर खेळाडूंना विशेषतः विदेशात फिटनेस मिळवत असलेल्या खेळाडूंना किंवा भारताबाहेर वैयक्तिक जबाबदारी असलेल्या खेळाडूंना अशीच सूट देण्यात येईल का, याबाबत चर्चा सुरू आहेत.अहवालानुसार, पहिल्या टप्प्यात फिटनेस चाचणी पूर्ण केलेल्या किंवा अंशतः उत्तीर्ण झालेल्या खेळाडूंमध्ये रोहित शर्मा, मोहम्मद सिराज, शुबमन गिल, जितेश शर्मा, प्रसिध कृष्णा, ऋतुराज गायकवाड, अभिषेक शर्मा, रवी बिश्नोई, संजू सॅमसन, शिवम दुबे, मोहम्मद शमी, वरुण चक्रवर्ती, मुकेश कुमार, हार्दिक पांड्या, सरफराज खान, तिलक वर्मा, अभिमन्यू ईश्वरन, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव, ध्रुव जुरेल, शार्दुल ठाकूर, वॉशिंग्टन सुंदर आणि यशस्वी जैस्वाल यांचा समावेश आहे.या टप्प्यात, खेळाडूंच्या रिकव्हरी पॅटर्न आणि मूलभूत स्ट्रेंथ टेस्टला प्राधान्य देण्यात आले. बीसीसीआयच्या सूत्रांनुसार, बहुतेक खेळाडूंनी फिटनेस पॅरामीटर्स यशस्वीरित्या पूर्ण केले आहेत. पण, काही खेळाडूंनी फक्त आंशिक फिटनेस चाचण्या घेतल्या आहेत. फिटनेस टेस्टचा दुसरा टप्पा सप्टेंबरमध्ये होणार आहे, ज्यामध्ये सध्या पुनर्वसन किंवा रिटर्न टू प्ले (RTP) टप्प्यातून जात असलेल्या खेळाडूंचा समावेश असेल. या यादीत केएल राहुल, आकाश दीप, रवींद्र जडेजा, नितीश रेड्डी आणि ऋषभ पंत यांची नावे आहेत. याशिवाय, दुखापती किंवा आजारपणामुळे पहिल्या टप्प्यात टेस्ट न देऊ शकलेल्या खेळाडूंचाही या टप्प्यात समावेश केला जाईल. गेल्या काही वर्षांत दुखापतग्रस्त खेळाडूंची वाढती संख्या पाहता, बीसीसीआय आणि संघ व्यवस्थापन फिटनेसबाबत अधिक कठोर झाले आहेत. बीसीसीआयने विराट कोहलीला लंडनमध्ये फिटनेस टेस्ट देण्यासाठी परवानगी दिली आहे. ज्यामुळे आता विराट कोहलीला सूट का यावरून चर्चा सुरू झाल्या आहेत. बंगळुरूमधील एनसीएमध्ये गेल्या आठवड्यात २९ ऑगस्टला खेळाडूंना फिटनेस टेस्टसाठी उपस्थित राहण्यास सांगितले होते. यादरम्यान रोहित शर्मा, शुबमन गिल, जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज या खेळाडूंनी फिटनेस टेस्ट दिली होती.

### निर्णयाने अनेकांच्या भुवया उंचावल्या

मात्र कोहलीला लंडनमध्ये टेस्ट देण्याकरता परवानगी दिल्याची माहिती समोर आली आहे सध्या आपल्या कुटुंबासह इंग्लंडमध्ये असलेल्या कोहलीला लंडनमध्ये देखरेखीखाली त्याची फिटनेस टेस्ट पूर्ण करण्याची परवानगी देण्यात आली. सर्व खेळाडूंसाठी सामान्यतः अपेक्षित असलेल्या प्रोटोकॉलमुळे विराटसाठी बदलण्यात आलेल्या निर्णयाने अनेकांच्या भुवया उंचावल्या.

# रौफची फलंदाजीत विश्वविक्रमी कामगिरी!

## अफगाणिस्तानविरुद्ध सामन्यात घडवला इतिहास

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पाकिस्तानला टी-२० तिरंगी मालिकेतील अफगाणिस्तानविरुद्ध सामन्यात पराभव पत्करावा लागला आहे. पण या सामन्यात पाकिस्तानच्या गोलंदाजाने मात्र उत्कृष्ट फलंदाजी करत मोठा विक्रम आपल्या नावे केला. अफगाणिस्तानच्या भेदक गोलंदाजीसमोर जिथे पाकिस्तानचे फलंदाज टिकू शकले नाहीत. तिथे हारिस रौफने वादळी फटकेबाजी करत मोठी कामगिरी केली आहे.**



हारिस रौफने अफगाणिस्तानविरुद्ध स्फोटक फलंदाजी करत इतिहास घडवला. १० व्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या रौफने फक्त १६ चेंडूत ३४ धावांची नाबाद खेळी केली. यादरम्यान त्याने ४ गगनचुंबी षटकार लगावले आणि आपल्या धमाकेदार फलंदाजीने सर्वांना आश्चर्यचकित केलं. हरिस रौफची ही खेळी पाकिस्तान क्रिकेट इतिहासात १० व्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या कोणत्याही फलंदाजाची सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या ठरली.

### संघासाठी महत्त्वपूर्ण योगदान

हरिस रौफने त्याच्या धमाकेदार खेळीदरम्यान चार षटकार लगावले. तो आता टी-२० मध्ये १० व्या क्रमांकावर फलंदाजी करताना एका डावात सर्वाधिक षटकार लगावणारा १०वा फलंदाज बनला आहे. एकूण चार फलंदाजांनी हे यश मिळवले आहे, परंतु रौफ हा कसोटी खेळणाऱ्या देशाकडून हा पराक्रम करणारा दुसरा खेळाडू ठरला आहे. वेस्ट इंडिजचा अकील हुसेन हा पराक्रम करणारा पहिला खेळाडू ठरला.

यापूर्वी हा विक्रम वेगवान गोलंदाज वहाब रियाझच्या नावावर होता, ज्याने १० व्या क्रमांकावर खेळताना २४ धावा केल्या होत्या. रौफने केवळ हा विक्रम मोडला नाही तर आपल्या आक्रमक खेळीने संघासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. रौफची नाबाद ३४ धावांची खेळी ही पूर्ण-सदस्य राष्ट्रांमधील टी-२० क्रिकेटमध्ये १० व्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या फलंदाजाने केलेली संयुक्तपणे दुसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या आहे. या यादीत झिम्बाब्वेच्या फराज अक्रमचाही समावेश आहे, ज्याने १० व्या क्रमांकावर फलंदाजी करताना ३४ धावा केल्या होत्या.


स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। गुरुवार।
। दि. 4 सप्टेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# दिघी-बोपखेलमध्ये भाजपा-राष्ट्रवादीतच "खेला होबे"!

## ग्राऊंड रिपोर्ट: प्रभाग क्रमांक 4 मध्ये भाजपा-राष्ट्रवादी- शिवसेना लढत

। पिंपरी चिंचवड । अविनाश आदक : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 ची प्रारुप प्रभाग रचना जाहीर झाली. ऑक्टोबरमध्ये हरकती आणि सूचनांची सुनावणी होईल आणि सदरची प्रभाग रचना अंतिम केली जाणार आहे. त्यानंतर आरक्षण सोडत आणि निवडणूक आचारसंहिता सुरू होईल. ही निवडणूक महायुती आणि महाविकास आघाडीतील घटकपक्ष स्वबळावर लढवतील, असे चित्र आहे. डिसेंबरमध्ये मतदान आणि जानेवारी-2026 मध्ये महानगरपालिकेत नवीन महापौर विराजमान होतील. या निमित्ताने "महाईन्यूज" च्या माध्यमातून प्रभागनिहाय राजकीय स्थितीबाबत विश्लेषण पहिला "ग्राऊंड रिपोर्ट" प्रसिद्ध करीत आहोत.**




2017 च्या निवडणुकीप्रमाणे प्रभाग "रचना जैसे थे" आहे. प्रभाग क्रमांक ४ मध्ये कोणताही बदल नाही. ज्याअर्थी 2017 प्रमाणे प्रभाग निश्चित झाले आहेत. त्यासाठी 2011 ची जनगनना ग्रहीत धरण्यात आली आहे. तत्कालीन जनगननेनुसार, प्रभागाची लोकसंख्या 55 हजार 539 इतकी दर्शवण्यात आली आहे. त्यापैकी 7 हजार 797 इतकी अनुसूचित जाती आणि 4 हजार 286 इतकी अनुसूचित जमातीची लोकसंख्या आहे.

लोकसंख्येच्या प्रमाणानुसार, 2017 मध्ये या प्रभागामध्ये भाजपाची मोठी लाट होती. या प्रभागातून भाजपाचे चार नगरसेवक निवडून आले होते. या प्रभागातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उमेदवारांचा पराभव झाला होता. भाजपाच्या उपमहापौर हिरानानी घुले आणि सरचिटणीस विकास डोळस या प्रभागातून प्रतिनिधीत्व करतात. माजी सैनिक स्व. लक्ष्मण उंडे येथून निवडून आले होते. गत निवडणुकीत अ-गटातून विकास डोळस यांनी 12 हजार 63 मते मिळवत, राष्ट्रवादीच्या वसंत इंगळे यांचा पराभव केला होता. ब-स्व. लक्ष्मण उंडे यांनी 11 हजार 690 मते मिळवत, बाळू लांडे यांचा पराभव केला होता. क- गटातून हिरानानी घुले यांनी 13 हजार 299 अशी सर्वाधिक मते मिळवली होती. त्यांनी वृषाली घुले-झुपके यांचा, तर ड- गटातून निर्मला गायकवाड यांनी 12 हजार 263 मते मिळवत कल्पना वाळके यांचा पराभव केला आहे.

भाजपाचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांचे कट्टर समर्थक विकास डोळस आणि हिरानानी घुले यांच्यावर प्रभागाची मदार आहे. विशेष म्हणजे, गायकवाड कुटुंबीयांचा प्रभागात प्रभाव राहणार आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून चंद्रकांत वाळके निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहेत.

2017 च्या आरक्षणानुसार, अ- नागरिकांचा मागास प्रवर्ग, ब- सर्वसाधारण महिला, क- सर्वसाधारण महिला आणि ड- सर्वसाधारण असे आरक्षण होते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला 50 टक्के आरक्षण आहे. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, ओबीसी आरक्षण पूर्ववत ठेवण्यात आले आहे. त्यामुळे आरक्षणामध्ये काही फार बदल होईल, असे चित्र नाही





" आमदार महेश लांडगे यांची लोकप्रियता आणि विकासकामांच्या जोरावर प्रभागातील चारही जागा भाजपा विजयी करेल. नगरसेवकांचे रिपोर्ट कार्ड चांगले आहे. बोपखेल पुलाचा प्रश्न मार्गी लागला आहे. रस्ते आणि पाणी पुरवठा सक्षम झाला आहे. विधानसभा निवडणुकीत या प्रभागातून भाजपाला सुमारे 6 हजार 500 मतांचे लीड मिळाले होते. त्याची पुनरावृत्ती आता महापालिका निवडणुकीत होईल.

**– विकास डोळस,** भाजपा.



" गेल्या आठ वर्षांमध्ये पाणी पुरवठ्याचा प्रश्न सत्ताधारी नगरसेवकांना सोडवता आला नाही. अनियमित आणि अपुरा पाणीपुरवठा यामुळे नागरिक त्रस्त आहेत. 24 तास पाणी पुरवठा बाबत दिलेले आश्वासन पाळले नाही. कोणताही डीपी रस्ता किंवा अंतर्गत रस्ते पूर्ण केले नाहीत. रस्त्यांची चाळण झाली आहे. वीज पुरवठा सक्षम नाही. तीन-चार तास परिसर अंधारात लोडशेडिंगमध्ये असतो. याकडे सत्ताधाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे.

**–चंद्रकांत वाळके,** राष्ट्रवादी अ.प.

### पक्षनिहाय इच्छुकांची नावे :

**1. भारतीय जनता पार्टी :** विकास डोळस, हिरानानी घुले, निर्मला गायकवाड, संजय गायकवाड, उदय गायकवाड, कुलदीप परांडे, चेतन घुले, आशा सुपे, कृष्णाजी सुरकुले.
**2. राष्ट्रवादी अ.प. गट :** चंद्रकांत वाळके, संतोष घोलप, अभिमन्यू दोरकर, मंगेश असवले, प्रतिभा दोरकर, शशिकांत घुले, समीर झपके.
**3. शिवसेना शिंदे गट :** मनिषा परांडे.
**4. राष्ट्रवादी श.प. गट :** ज्ञानेश आल्हाट, धनंजय खाडे, समाधान कांबळे.
**5. शिवसेना उबाठा गट :** संतोष वाळके, कृष्णा वाळके,
**6. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस :** अद्याप कोणी नाही.
**7. महाराष्ट्र नवनिर्माण सेना :** दत्ता घुले.

### प्रभागातील समाविष्ट भाग :

दिघी, गजानन महाराज नगर, भारतमाता नगर, गायकवाडनगर, भंडारी स्कायलाईन, समर्थनगर, कृष्णानगर, भाग-2 बोपखेल आदी.



### 2017 मधील विजयी उमेदवार:

अ - विकास डोळस - भाजपा
ब - स्व. लक्ष्मण उंडे - भाजपा
क- हिरानानी घुले - भाजपा
ड - निर्मला गायकवाड - भाजपा

## जिवंत देखावा पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी

# लग्न सोहळा: खर्चाचा की विचारांचा?

## चिंतामणी मित्र मंडळचा लक्षवेधी पुढाकार : जिवंत देखाव्याला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद!

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड: यंदा २३ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या चिंतामणी मित्र मंडळाने गणेशोत्सवाचे औचित्य साधत समाजप्रबोधनाचा संदेश देणारा "लग्न सोहळा – खर्चाचा की विचारांचा?" हा जिवंत देखावा सादर करून सर्वांचे लक्ष वेधले आहे. मंडळाच्या सभासदांनीच साकारलेल्या या प्रभावी देखाव्याला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून, देखावा पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी उसळत आहे.**




या देखाव्यात पंकज फडणीस, दत्तात्रय हरपळे, भाग्येश अवधानी, सौ. उषा साळुंखे, मनीषा रांधवणे, सौ. अनघा अवधानी व कुमारी श्रुती फडणीस यांनी आपल्या सशक्त अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली. देखाव्याचे लेखन मंडळाचे उपाध्यक्ष श्री. राजीव शेंडे यांनी केले असून, त्यांनी अतिशय नेमक्या शब्दांत सामाजिक वास्तवाला वाचा फोडली आहे.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने मंडळाने विविध सामाजिक उपक्रम राबवले असून, चार गरजू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारणे हा त्यातील एक स्तुत्य उपक्रम ठरला आहे.

त्याचप्रमाणे विविध वयोगटांसाठी खेळ, कला आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या स्पर्धांचे आयोजन करून गणेशोत्सवाचा उत्सव अधिक रंगतदार करण्यात आला आहे. मंडळाचे अध्यक्ष श्री. नीलेश आहेर व सचिव श्री. दिलीप पडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली चिंतामणी मित्र मंडळ सामाजिक जाणीव ठेवत गणेशोत्सव साजरा करत आहे. यावर्षीचा देखावा आणि उपक्रम हे मंडळाच्या समाजाभिमुख कार्याची साक्ष देणारे ठरले आहेत.



"आजच्या काळात लग्न हे दोन मनांचा मिलाप असावा, केवळ खर्चाचा आणि दिखाव्याचा सोहळा नव्हे. आपण समाजाला दिशा देणारे बनूया — विचारांची, संवेदनांची आणि सच्च्या माणुसकीची. हा देखावा केवळ एक सादरीकरण नाही, तर बदल घडवण्याचा आमचा प्रयत्न आहे."
**–श्री. नीलेश आहेर,** अध्यक्ष, चिंतामणी मित्र मंडळ.

## घरगुती गौरी गणपती सजावट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## चांगभलं प्रतिष्ठानच्या; दहा लकी ड्रॉ विजेत्यांना पैठणी, सात विजेत्यांना आकर्षक बक्षीस

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**चांगभलं प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या घरगुती सजावट स्पर्धेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत या स्पर्धेमध्ये तब्बल अडीचशेहून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला आहे. या उपक्रमात सहभागी झालेल्या प्रत्येक स्पर्धकाचा उत्साह वाढवण्यासाठी विविध बक्षिसांची मेजवानी ठेवण्यात आली असल्याचे चांगभलं प्रतिष्ठानचे आयोजक सागर थोरात यांनी सांगितले..**




या स्पर्धेतील खास आकर्षण लकी ड्रॉद्वारे देण्यात आलेल्या पैठण्या ठरत आहे. एकूण दहा विजेत्यांना लकी ड्रॉच्या माध्यमातून पारंपरिक व आकर्षक अशा पैठण्या भेट देण्यात येणार आहे. याशिवाय मुख्य स्पर्धेतील सात विजेत्यांची निवड करून त्यांना टीव्ही, फ्रिज, मोबाईल, गॅस शेगडी यांसारखी उपयोगी व आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. या स्पर्धेचा अंतिम निकाल आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती चांगभलं प्रतिष्ठानचे आयोजक सागर थोरात यांनी दिली. त्यांनी पुढे सांगितले की, "सर्वच सहभागी स्पर्धकांना पारितोषिक देऊन त्यांचा उत्साह वाढवण्याचा आमचा उद्देश आहे. नागरिकांचा मिळालेला प्रतिसाद हा खूपच प्रेरणादायक आहे." स्पर्धेच्या निमित्ताने नागरिकांमध्ये सामाजिक दायित्व वाढवण्याबरोबरच सामाजिक एकोपा आणि सहभागाचाही सुरेख अनुभव या उपक्रमातून घेता आला, असे आयोजक सागर थोरात यांनी नमूद केले.

## सामाजिक जागृतीवर भर देत विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम

# “गणेशोत्सव म्हणजे समाज जागृतीचे प्रभावी व्यासपीठ”! : विजय गुप्ता

### काळभोरनगरमधील श्री हनुमान मित्र मंडळाकडून जिवंत देखावे, सामाजिक उपक्रम

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड – चिंचवडमधील प्रतिष्ठित श्री हनुमान मित्र मंडळ यंदा आपल्या चाळीसाव्या वर्षात पदार्पण करत असून, या विशेष पर्वावर मंडळाने नेहमीप्रमाणेच सामाजिक जागृतीवर भर देत विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.**



गणेशोत्सवाच्या निमित्ताने २७ ऑगस्टपासून ते ५ सप्टेंबरपर्यंत मंडळ परिसरात अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवले जात आहेत. यामध्ये “बेटी बचाव, बेटी पढाव”, “कुटुंब एकता”, “पाणी वाचवा देश वाचवा”, “वृद्धाश्रम” अशा विषयांवर जिवंत देखावे सादर करून समाजमनावर ठसा उमटविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच लोककला आणि लोकनाट्याद्वारेही सामाजिक संदेश पोहोचविण्याचे कार्य सुरू आहे.

उत्सवाची सुरुवात श्रीगणेश आगमन सोहळ्याने झाली असून, समारोप ५ सप्टेंबर रोजी श्रीगणेश विसर्जन मिरवणुकीने होणार आहे. धार्मिक श्रद्धेच्या दृष्टीनेही विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून, त्यामध्ये सत्यनारायण महापूजन, दुग्धाभिषेक यांचा समावेश आहे.

मंडळाचे संस्थापक अध्यक्ष विजय गुप्ता म्हणाले, “गणेशोत्सव हा फक्त भक्तीचा उत्सव नसून समाजाला योग्य दिशा देण्याचे एक प्रभावी व्यासपीठ आहे. त्यामुळे यंदाही समाजप्रबोधनाला प्राधान्य देत मंडळाने विविध उपक्रम राबवले आहेत.”

काळभोरनगरमधील या उपक्रमांना स्थानिक नागरिक, तरुण वर्ग आणि महिला मंडळांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून, सामाजिक जाणिवा अधिक दृढ करण्यास हा उत्सव उपयुक्त ठरत आहे.




College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
A
NAAC
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm Your
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad